सकाळ

# गणेशमूर्ती, निर्माल्य संकलनात विद्यार्थ्यांचा सहभाग

## सकाळ 'यिन', पिंपरी चिंचवड पालिकेच्या उपक्रमाला महाविद्यालयांचा प्रतिसाद

**पिंपरी, ता. १०** : श्री गणेश मूर्ती व निर्माल्य संकलनाचे उपक्रम महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी राबविले. यासाठी सकाळ 'यिन' (यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मराठवाडा मित्र मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, थेरगाव यांनी पुढाकार घेतला. प्रामुख्याने नदी प्रदूषण टाळणे, पर्यावरण संवर्धन आणि विसर्जन निर्विघ्नपणे पार पाडणे हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश होता.

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

मराठवाडा मित्र मंडळ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्राचार्य डॉ. मनोहर पाटील यांच्या मार्गदर्शनात सहभाग नोंदवला. या उपक्रमासाठी 'यिन'चे कार्यक्रम अधिकारी चेतन लिम्हण यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

आकुर्डी येथील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, रिसर्च अँन्ड मॅनेजमेंट, आकुर्डी महाविद्यालय विद्यार्थ्यांनी पवना नदी घाटावर निर्माल्य संकलन करून परिसर स्वच्छता केली.

हा उपक्रम ग्रीन क्लब व 'यिन' क्लबच्या माध्यमातून संचालक डॉ. संतोष खलाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यामध्ये 'यिन' अध्यक्ष ऋतिक कांबळे, सौरभ गालफाडे, निकिता तुपे, प्रीती रोळेकर यांचा विशेष सहभाग होता. प्रा. पूजा प्रजापती यांनी विशेष पुढाकार घेतला.

दरम्यान, एस.बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाइनच्या विद्यार्थ्यांनी विविध विसर्जन घाटांवर नागरिकांना मूर्ती व निर्माल्य वेगळे करण्यास मदत केली. कृत्रिम तलावात विसर्जन करण्याचे आवाहन करून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. या उपक्रमासाठी प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी, प्रा. ऋतुराज कुलकर्णी, प्रा. ऋजुता पाठक यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये 'यिन'च्या सहकार्याने विद्यार्थी आदित्य काळे, आदर्श प्रधान, श्रेयश जाधव, वेदांत काळे, सुजल कुठे, सायली जगनाडे, आर्य मोरे, प्रथमेश चव्हाण यांनी सक्रिय सहभाग घेतला.

या सर्व उपक्रमांना 'पीसीईटी'चे विश्वस्त सदस्य अध्यक्ष डी. पी. लांडगे, उपाध्यक्ष पद्मा भोसले, सचिव व्ही.एस. काळभोर, कोषाध्यक्ष एस. डी. गराडे व कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी शुभेच्छा दिल्या.